# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 17/10/2020 (शनिवार)

(दुपार)

---

### विनयभंग

पो.स्टे. कोंढाळी :– दि. 07/10/2020 चे 10:00 वा. चे सुमारास 21 वर्षीय पिडीत/फिर्यादी हि तिच्या राहत्या घरी झोपली असता आरोपी नामे– बळीराम प्रेमसिंग चव्हाण, वय 40 वर्ष, रा. वसंतनगर तांडा, ता. काटोल, जि. नागपूर याने पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम 354 (अ) भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा सुनिल बन्सोड 9764090208 हे करीत आहे.

### अकस्मात मृत्यु

पो.स्टे. बोरी :– अंतर्गत बुटीबोरी शिवार येथे दिनांक 15/10/2020 चे 03.10 वा सुमारास यातील मृतक – अनोळखी पुरूष, वय अंदाजे 35 ते 40 वर्ष हा एमडीआयटी एसपीएल रेल्वेच्या समोर पटरीवर अचानक आल्याने तो रेल्वेने कटुन मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– राजेंद्र शेषराव गुडधे (स्टेशन प्रबधक बुटीबोरी), वय 34 वर्ष यांचे रिपोर्टवरुन पो. स्टे. बोरी येथे कलम 174 जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फोजदार श्री. कोडापे 8888864967 हे करीत आहेत.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर